दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १५३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ समिती

**मुंबई :** राज्यावर दुष्काळाचे संकट घोंगावत असताना त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला मंत्रिमंडळाचे अधिकार देण्यात आले असून दुष्काळी परिस्थितीत आवश्यक निर्णय घेण्याचे आणि उपाययोजना करण्याचे अधिकार समितीला असतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली.

## पु. ल. देशपांडे यांच्या संग्रहित पत्रांचे पुस्तक प्रकाशित होणार

**मुंबई :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वाला समृद्ध करणाऱ्या पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करून तो पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या संकल्पाला आता शासन निर्णयाचे बळ मिळाले आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या पुढाकारातून पु. ल. देशपांडे यांच्या संग्रहित पत्रांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी होणाऱ्या खर्चास १० लाख रुपयांपर्यंतच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## थोडक्यात वार्ता

### आता डेटा नसलेले कॉलिंग, SMS रिचार्ज प्लॅन मिळणार!

**मुंबई :** मोबाईल ग्राहकांसाठी भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (TRAI) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. 'टेलिकॉम ग्राहक संरक्षण (तेरावी सुधारणा) नियम, २०२६' जारी करण्यात आले असून, त्यानुसार दूरसंचार कंपन्यांना केवळ व्हॉइस कॉलिंग आणि SMS सुविधा असलेले रिचार्ज प्लॅन उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल. या प्लॅनमध्ये इंटरनेट डेटाचा समावेश नसेल. त्यामुळे ज्यांना मोबाईलवर केवळ कॉलिंग आणि मेसेजिंगची गरज आहे, अशा ग्राहकांना डेटा नसलेला स्वतंत्र रिचार्ज पर्याय मिळू शकणार आहे. TRAIच्या म्हणण्यानुसार, आतापर्यंत बाजारात केवळ कॉलिंग आणि SMS सुविधा असलेल्या प्लॅनची संख्या मर्यादित होती. तसेच कमी वैधतेचे रिचार्ज पर्यायही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हते. ही बाब लक्षात घेऊन ग्राहकांना अधिक पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या नियमानुसार, ज्या ग्राहकांना ३० दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीचा रिचार्ज करायचा आहे, त्यांच्यासाठी दूरसंचार कंपन्यांना व्हॉइस कॉलिंग आणि SMS सुविधा असलेला प्लॅन देणे बंधनकारक असेल. याशिवाय, ग्राहकांना दर महिन्याला एका ठराविक तारखेला रिचार्जचे नूतनीकरण करता येईल, असा पर्यायही कंपन्यांना उपलब्ध करून द्यावा लागेल. त्यामुळे ग्राहकांना प्रत्येक महिन्यात वेगवेगळ्या तारखांना रिचार्ज करण्याची गरज कमी होईल.

### माजी नगरसेविका विशाखा राऊत यांना झटका; अपात्रता कायम

**मुंबई :** उबाठा गटाच्या माजी नगरसेविका विशाखा राऊत (Vishakha Raut) यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा कायदेशीर फटका बसला आहे. बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणामुळे नगरसेवक पद रद्द होण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले आहे. न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तसेच जात पडताळणी समितीच्या आदेशाला स्थगिती देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. त्यामुळे विशाखा राऊत यांची नगरसेवक पदावरील अपात्रता कायम राहिली असून, त्यांना कोणताही अंतरिम दिलासा मिळालेला नाही.

स्थगिती देण्यास खंडपीठाचा साफ नकार : न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर विशाखा राऊत यांनी दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेवर (SLP) सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने या याचिकेवर नोटीस जारी केली खरी, परंतु उच्च न्यायालयाच्या अपात्रतेच्या निर्णयाला अथवा पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या आदेशाला स्थगिती देण्यास साफ नकार दिला. या निर्णयामुळे विशाखा राऊत यांच्याविरुद्ध जारी झालेली अपात्रतेची राजपत्र अधिसूचना लागूच राहणार आहे.

### राजकीय मागण्यांत रस नाही; विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण करू!

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्षांच्या राजीनाम्याची होत असलेली मागणी ही राजकीय स्वरूपाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना सरकारचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. "आम्हाला राजकीय मागणीत रस नाही. त्याचे जे व्हायचे असेल ते होईल. आमचा इंटरेस्ट विद्यार्थ्यांच्या मागण्यांमध्ये आहे. विद्यार्थ्यांची प्रत्येक न्याय्य मागणी राज्य सरकार पूर्ण करेल," अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी ज्या परीक्षा किंवा कथित घोटाळ्याच्या संदर्भात केली जात आहे, तो प्रकार संबंधित अध्यक्ष पदावर येण्यापूर्वीच घडला होता. एमपीएससीच्या भरतीसंदर्भातील अधिकार राज्यपालांकडे आहेत.




## प्रभाग क्रमांक 5 मध्ये ड्रेनेजमिश्रित पिण्याचे पाणी; नागरिकांमध्ये संताप



छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील हेड पोस्ट ऑफिससमोरील परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून नळाद्वारे ड्रेनेजमिश्रित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, दूषित पाण्यामुळे आजारांचा धोका वाढला आहे.

या प्रकाराची माहिती मिळताच युवा नेते व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शेख इस्माईल राजा यांनी घटनास्थळी भेट देऊन नागरिकांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्याला दूषित पाणी दाखवून तातडीने पाहणी करून ही समस्या नेमकी कुठून निर्माण होत आहे, याचा शोध घेण्याची मागणी केली. संबंधित कर्मचाऱ्यानेही पाण्याच्या समस्येची पाहणी करून कारण शोधले जाईल, असे सांगितल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शहर उपाध्यक्ष शेख इस्माईल राजा यांनी सांगितले.

दरम्यान, "हेड पोस्ट ऑफिससमोरील हा परिसर जणू वाऱ्यावर सोडलेला आहे. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे जनप्रतिनिधी कोणतीही दखल घेत नसल्यामुळे या भागात समस्यांची बोंबाबोंब सुरू आहे," असा आरोप शेख इस्माईल राजा यांनी केला.

पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी मिसळणे ही गंभीर बाब असून, महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा वाहिनीची तपासणी करून दूषित पाण्याची समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

"जनप्रतिनिधींनी या भागातील नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे. इतकी वर्षे जनतेची कामे केली असतील तर आता नागरिकांच्या समस्या सोडवून दाखवा. येथील जनप्रतिनिधींनी आमच्याकडून बक्षीस घेऊन जावे," असा उपरोधिक टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष शहर उपाध्यक्ष शेख इस्माईल राजा यांनी लगावला.

## डब्यात मेथीची भाजी आणली म्हणून विद्यार्थ्याला 50 रुपयांचा दंड ? शाळा प्रशासनाचा अजब अट्टाहास

**मुंबई :** मिरा-भाईंदर परिसरातील शाळांमध्ये पर्यूषण पर्वाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या आहारावर लादल्या जाणाऱ्या निर्बंधांचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. आमदार नरेंद्र मेहता यांच्या 'सेव्हन स्क्वेअर' शाळेतील वादानंतर आता भाईंदर येथील 'तपोवन विद्यालया'तही असाच एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका अल्पवयीन विद्यार्थ्याने डब्यात मेथीची भाजी आणली म्हणून शाळेने त्याला चक्क ५० रुपयांचा दंड ठोठावल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. तपोवन विद्यालयाने पर्यूषण पर्वाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना डब्यात विशिष्ट खाद्यपदार्थ न आणण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये मांसाहारासोबतच कांदा, लसूण, बीट आणि जमिनीखाली उगवणाऱ्या इतर भाज्यांवर बंदी घालण्यात आली होती. मात्र, एका विद्यार्थ्याने नेहमीप्रमाणे आपल्या डब्यात मेथीची भाजी आणली. हे शिक्षकांच्या निदर्शनास आल्यावर त्याला नियमांचे उल्लंघन केल्याचे सांगत ५० रुपयांचा दंड आकारण्यात आला. एवढ्यावरच न थांबता, विद्यार्थ्याचा डबा बाजूला ठेवून त्याला शाळेच्या उपाहारगृहातून (कॅन्टीन) दुसरे अन्न विकत घेऊन खाण्यास सांगण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे.

**शिक्षण विभागाची शाळेला 'कारणे दाखवा' नोटीस**

या घटनेची माहिती मिळताच शिक्षण अधिकाऱ्यांनी तपोवन विद्यालय प्रशासनाला 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे. विद्यार्थ्यांना असा दंड आकारण्याचा अधिकार शाळेला कोणत्या नियमांतर्गत मिळाला? तसेच धार्मिक किंवा सांस्कृतिक कारणास्तव आहारावर असे निर्बंध लादण्यासंदर्भात शाळेने काय आदेश जारी केले होते, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने मागवले आहे.

**पालकांमध्ये संतापाचे वातावरण; पुढील कारवाईकडे लक्ष**

शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आहारावर धार्मिक किंवा सांस्कृतिक नियम सक्तीने लादले जाऊ शकतात का, यावरून आता नवीन शैक्षणिक व सामाजिक वाद निर्माण झाला आहे. शाळेच्या अशा मनमानी कारभारावर पालकांनी आणि नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महापालिका शिक्षण विभागाकडून शाळेच्या उत्तरानंतर काय कायदेशीर कारवाई केली जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अवजड ट्रक क्रांतीचौक उड्डाणपूलात अडकल्याने पुलाला तडे

### गोंधळलेल्या चालकापायी ट्रॅफिक जाम



**छत्रपती संभाजीनगर :** जालनारोडवरील क्रांतीचौक उड्डाणपूलाखाली अवजड ट्रकने शिरकाव करताच हे अगडबंब वाहन पूलाखाली अडकल्याने एकच धांदल उडाली.यामुळे पूलाखालील भिंतीस तडाही बसला.मंगळवारी सकाळी साडे आठवाजेच्या सुमारास हा विचित्र प्रसंग उद्भवताच ट्रक चालक पुरता गोंधळून गेला. आजूबाजूलाच असलेल्या नागरिकांनी या चालकास पूलाच्या मधोमध फसलेले हे महाकाय वाहन काढण्यासाठी दिशानिर्देश दिले.लोकांनी आरडाओरड करत चालकावर तोंडसुख घेतल्याने घाबरगुंडी उडालेल्या चालकाची सदरील वाहन वळवताना घाबरगुंडी उडाली. याच गोंधळात ट्रकचे टायरही फुटले.

महतप्रयासाने वळवलेले हा ट्रक शेवटी आकाशवाणी मार्गाच्या रोडने निघून गेला तेव्हा अडकलेल्या वाहनधारकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

अधिक माहिती व प्रत्यक्षदर्शीनुसार एम.एच.43 सी.ई.7682 हा मालभरलेला ट्रक क्रांतीचौकातील उड्डाणपूलाजवळून वळण घेताना चालकाला पूलाच्या उंचीचा अंदाज आला नाही व हे लांबलचक मोठे वाहन पूलाच्या भिंतीस धडकून फसले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असणे व समोरच दोन मंडळांचे मोठे गणपतीचे मंडप असल्याने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नागरिकांकडून वाहतूक सुरळीत करण्यात मोलाची मदत करण्यात आली. विशेष म्हणजे यावेळी तेथे एकही वाहतूक पोलीस हजर नव्हता.

## मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आयकर विभागाकडून चौकशी


**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित काही नेते, त्यांचे नातेवाईक आणि व्यावसायिक सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आयकर विभागाकडून छाननी केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. आयकर विवरणपत्रे, मालमत्ता, मोठे आर्थिक व्यवहार तसेच व्यावसायिक संबंधांची तपासणी केली जाणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाशी संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संबंधित कंपन्यांना मिळालेल्या सरकारी कंत्राटांचीही चौकशी केली जाणार असल्याचे समजते.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांबरोबरच निधीच्या स्रोताची, जमीन आणि मालमत्तेचीही छाननी केली जात आहे. छत्रपती संभाजीनगरमधील एका कंपनीला सुमारे ७६४.७ कोटी रुपयांची सरकारी कामे मिळाल्याच्या आरोपांचीही तपासणी केली जाणार आहे. कंत्राटातील बोली प्रक्रिया आणि संबंधित व्यवहारांमध्ये झालेली वाढ यांचीही तपासणी होणार आहे.

या व्यवहारांकडे मनोज जरांगे पाटील यांचे माजी सहकारी अजय बारस्कर यांनी केलेल्या आरोपांनंतर लक्ष वेधले गेले होते. बारस्कर यांनी जरांगे यांच्यावर आंदोलनाच्या माध्यमातून कंत्राटे मिळवून दिल्याचे आरोप केले होते. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जरांगे यांच्या भेटीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या पहिल्या महिला अध्यक्षपदी डॉ. उज्ज्वला कराड-दाहिफळे यांची अडीच वर्षांसाठी निवड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) अध्यक्षपदी छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ प्लास्टिक सर्जन डॉ. उज्ज्वला कराड-दाहिफळे यांची पुढील अडीच वर्षांसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. मराठवाड्यातील महिला डॉक्टरला हा ऐतिहासिक मान मिळाल्याने वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

परिषदेच्या निवडणूक प्रक्रियेनंतर अध्यक्षपदासह अन्य पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नांदेडचे डॉ. संजय कदम यांची सचिवपदी, तर डॉ. राहुल कुलकर्णी यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. अनिल पाटील, डॉ. सुनील इंगळे, डॉ. संजय देशपांडे, डॉ. प्रशांत चौधरी आणि डॉ. चंद्रशेखर गिलूरकर यांची निवड झाली आहे. डॉ. सुवर्णा खरात आणि डॉ. संदीप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली निवड प्रक्रिया पार पडली. डॉ. कराड-दाहिफळे यांनी डॉक्टरांचे प्रश्न, वैद्यकीय नैतिकता, रुग्णहित आणि पारदर्शक प्रशासन या विषयांवर सातत्याने काम केले आहे. २०२६च्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीत निवडून आलेल्या नऊ सदस्यांमध्ये त्या एकमेव महिला सदस्य असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय व्यवसायातील नैतिकता अधिक बळकट करणे, परिषदेच्या कारभारात पारदर्शकता आणणे, डॉक्टरांच्या प्रश्नांचे प्रभावी निराकरण करणे आणि रुग्णहिताला प्राधान्य देण्यावर भर राहील, अशी अपेक्षा वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

## 'फिट संभाजीनगर'ची हाक; क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी महापालिका सज्ज!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

शहरातील क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी, विविध क्रीडा प्रकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये आरोग्य व फिटनेसबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने 'फिट संभाजीनगर' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या विशेष संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात येत असून, आगामी ऑक्टोबर महिन्यात याचे आयोजन केले जाणार आहे.

'फिट संभाजीनगर' उपक्रमाच्या प्रभावी नियोजनाबाबत आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एका उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विविध महत्त्वपूर्ण सूचना व निर्देश दिले. या उपक्रमामध्ये शहरातील विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षक तसेच क्रीडा संघटनांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच आधुनिक खेळांसोबतच शहरातील स्थानिक व पारंपरिक क्रीडा प्रकारांना विशेष प्राधान्य देण्यात येणार असून यामध्ये कबड्डी, कुस्ती यांसारख्या खेळांचा प्रामुख्याने समावेश केला जाणार आहे.

हा उपक्रम केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो निरंतर चालवण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे. याअंतर्गत दर महिन्याच्या पहिल्या रविवारी विविध क्रीडा व फिटनेस उपक्रमांचे आयोजन केले जाईल. यात मॅरेथॉन, सायकलिंग, झुंबा फिटनेस सत्र तसेच विविध स्पर्धात्मक खेळांचा समावेश असणार आहे. याशिवाय, महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त पारंपरिक खेळांचे विशेष सामने व सोहळे आयोजित केले जावेत, असे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत. विविध क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ व नामांकित प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या सर्व स्पर्धा पार पडणार आहेत.

## धार्मिक मिरवणुकांतील आवाजावर हायकोर्टाची नजर, कायद्याच्या अंमलबजावणीचा मागवला अहवाल

**मुंबई :** धार्मिक मिरवणुका आणि उत्सवांदरम्यान होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांदरम्यान होणाऱ्या मोठ्या आवाजाबाबत न्यायालयाने राज्य सरकारकडून संबंधित कायदे आणि त्यांची अंमलबजावणी कशी केली जात आहे, याची माहिती मागवली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले. ध्वनिप्रदूषणासंदर्भात कायद्याचे मजबूत चौकट अस्तित्वात असतानाही प्रत्यक्षात त्याची अपेक्षित अंमलबजावणी होत नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. उत्सव आणि धार्मिक मिरवणुका आयोजित करण्यास आक्षेप नसला, तरी त्याचा नागरिकांच्या कायदेशीर हक्कांवर विपरीत परिणाम होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्याची वार्षिक सभा उत्साहात

### सभासदांना 6 टक्के लाभांश देण्यास बहुमताने मंजुरी; यंदा 3.50 ते 4 लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिदिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजी राजे साखर उद्योग लि., दीनदयाळनगर, चित्तेपिंपळगाव येथील कारखान्याची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि. २२) कारखाना कार्यस्थळावर उत्साहात पार पडली. अहवाल काळातील नफ्याचा विचार करून सभासदांना ६ टक्के लाभांश देण्यास सभासदांनी बहुमताने मंजुरी दिली. यंदा कमी पावसामुळे ऊस उत्पादनात घट होण्याची शक्यता असली, तरी कारखान्याने ३.५० ते ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे.

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी कारखान्याच्या वाटचालीचा आढावा घेत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, कारखान्याचे देणे द्यावेच लागते; मात्र येणे कधी मिळेल याचा भरोसा नसतो. या दोन्ही बाबींमधील फरक लक्षात घेऊन आर्थिक शिस्त राखली तरच कारखाना यशस्वीपणे चालविता येतो.

हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्याने ३ लाख ३० हजार ८०४ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून ३ लाख ३५ हजार ९८० क्विंटल साखरेचे उत्पादन केले. सरासरी साखर उतारा १०.१५६ टक्के राहिला. एफआरपी २,४७६.९० रुपये असताना कारखान्याने ऊस उत्पादकांना प्रतिटन २,९०० रुपये दर दिला असून, वाढीव १०० रुपये प्रतिटन अंतिम हप्ता लवकरच देण्यात येणार असल्याचे सभेत सांगण्यात आले.

शेतकऱ्यांना ऊसाचा अधिक दर मिळावा यासाठी कारखान्याने ३० केएलपीडी डिस्टीलरी प्रकल्पाचे काम २३ ऑक्टोबर २०२३ रोजी पूर्ण करून इथेनॉल निर्मिती सुरू केली. आतापर्यंत १ कोटी ४६ लाख ६६ हजार ४१६ लिटर इथेनॉलचे उत्पादन झाले असून, त्यापैकी १ कोटी २७ लाख ३७ हजार ५०० लिटर इथेनॉलची विक्री इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांना करण्यात आली. त्यातून कारखान्याला ६६ कोटी ६६ लाख २८ हजार ७०० रुपयांचे उत्पन्न मिळाले.

डिस्टीलरीतील स्पेन्ट वॉशवर प्रक्रिया करून हंगामात ८ लाख ८९ हजार ३२२ एनएम३ बायोगॅसची निर्मिती करण्यात आली. त्याचा बॉयलरसाठी इंधन म्हणून वापर करण्यात आला. यंदा या बायोगॅसपासून सीबीजी निर्मिती करण्याचे नियोजन आहे. तसेच स्प्रे ड्रायरच्या माध्यमातून ६०.१०० मेट्रिक टन पोटॅश पावडर तयार करून ऊस उत्पादकांना अल्प दरात विक्री करण्यात आली.

को-जनरेशन प्रकल्पातून ५० लाख २८ हजार ५२५ युनिट वीज निर्मिती करून ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला विक्री करण्यात आली. कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक विवेक देशपांडे यांनी नानांनी २००१ मध्ये कारखाना उभारून काटकसरीने २५ वर्षे यशस्वीपणे चालविल्याचे नमूद केले.

विस्मा संस्थेचे अध्यक्ष तथा नॅचरल शुगरचे चेअरमन बी. बी. ठोंबरे यांनी कमी गाळप क्षमतेच्या कारखान्यात को-जनरेशन, डिस्टीलरी, इथेनॉल, ड्रायर, पोटॅश आणि सीबीजीसारखे प्रकल्प उभारून सभासदांना लाभांश तसेच मोफत साखर देणारा कारखाना उभारल्याचे सांगितले. कारखाना संचालक प्रल्हाद पन्हाळे यांनीही मनोगत व्यक्त केले.कारखान्याचे सरव्यवस्थापक दिगंबर बडदे यांनी प्रास्ताविक केले. मुख्य लेखाधिकारी शिवाजीराव टकले यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. उपाध्यक्ष दामोधर (आण्णा) नवपुते यांनी आभार मानले. यावेळी संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने सभासद व ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# सं पा द की य

## निवृत्त न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण यांनी आपल्या पदाचा राजीनामा

महाराष्ट्रात समान नागरी कायदा (Uniform Civil Code) लागू करण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या विशेष समितीमधून मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिल्यामुळे राजकीय आणि कायदेशीर वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. समितीचे कामकाज चालवण्याची पद्धत, लोकांकडून अभिप्राय घेण्याची घाईगडबडीची प्रक्रिया आणि समितीबाहेरील एका अधिकाऱ्याचा वाढता हस्तक्षेप यावर तीव्र आक्षेप घेत त्यांनी हा कठोर निर्णय घेतला आहे. निवृत्त सर्वोच्च न्यायालयीन न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखालील या सात सदस्यीय समितीची स्थापना जुलै महिन्यात करण्यात आली असून, सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाच सुरुवातीलाच निर्माण झालेल्या या वादानुसार समितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. समितीच्या बैठकीत घडलेल्या प्रकाराबाबत न्यायमूर्ती चव्हाण यांनी अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना देसाई आणि इतर सदस्यांना पाठवलेल्या ईमेलमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बैठकीत मागील बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणे, अभिप्रायासाठीची वेबसाइट आणि प्रश्नावली अंतिम करणे हे विषय अतिशय घाईघाईत उरकण्यात आले. प्रश्नावलीबाबत डॉ. सुवर्णा रावल यांच्यासह इतर तीन सदस्यांनी काही महत्त्वाच्या सुधारणा व सूचना मांडण्याचा प्रयत्न केला होता. उत्तरदारांना फक्त 'होय किंवा नाही' असे पर्याय ठेवावेत का, तसेच प्रश्नावली तज्ज्ञ प्राध्यापकांकडून तपासून घ्यावी का, असे प्रस्ताव सदस्यांनी मांडले होते. मात्र, अध्यक्षांनी स्वतः तयार केलेली प्रश्नावली आधीच अंतिम केली असल्याचे सांगत ती थेट वेबसाइटवर अपलोड केली जाईल असे स्पष्ट केले. चर्चेला कोणताही वाव उरला नसल्याचे पाहून वेळ वाचवण्यासाठी आपण बैठकीतून बाहेर पडलो, असे चव्हाण यांनी नमूद केले आहे. लोकांचे मत जाणून घेण्याच्या प्रक्रियेवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, सुरुवातीला हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेची मते जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्यात व्यापक एकमत घडवून आणण्यासाठी आहे, असा त्यांचा समज होता. उशिरा होणारे विवाह, वैवाहिक समस्या, वाढती बंध्यत्वता, विस्कळीत संसार आणि दीर्घकाळ चालणारे न्यायालयीन वाद यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर सखोल चर्चा होणे अपेक्षित होते. परंतु, आता हे महत्त्वाचे विषय बाजूला सारून केवळ माहितीचे विश्लेषण सोपे व्हावे यासाठी 'होय किंवा नाही' या अत्यंत मर्यादित स्वरूपात लोकांची मते गोळा केली जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. याशिवाय, समितीतील बाहेरील व्यक्तीच्या हस्तक्षेपावरही त्यांनी थेट आक्षेप घेतला. बैठकीला उपस्थित राहिलेले शत्रूघ्न सिंह यांनी समितीच्या वेबसाइटची पाहणी करून काही बदल सुचवले होते आणि अध्यक्षांनी ते बदल पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. समितीचे अधिकृत सदस्य नसताना सिंह यांचा या प्रक्रियेत असा सहभाग कसा असू शकतो, असा सवाल उपस्थित करत चव्हाण यांनी टोला लगावला की, कदाचित महाराष्ट्रातील अधिकारी हे काम करण्यास सक्षम नाहीत असा विचार करून राज्याबाहेरील अधिकाऱ्याची मदत घेतली गेली असावी.

# सुगंध दशमी निमीत्त राजाबजार जैन मंदिरात भगवंताला फुलाची चादर व धुप अर्पण

## संयम हेच मनुष्य जीवनाची सार्थकता आचार्य विनम्र सागरजी महाराज



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी श्री. खडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य विनम्रसागर महाराज यांचा चातुर्मास उत्साहात सुरु असुन त्यांच्या सानिध्यात आज सुगंधी दशमी व उत्तम संयम या दिवशी सकाळी राजाबजार मदिरात भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान विजयाबाई निलेश नितीन सैठी परीवार यांना मिळाला. तसेच सुगंधी दशमी निमीत्त शांतीधारेचा मान व सुगंधी दशमी निमीत्त भगवंताला धुप चढविण्याचा मान दिलीप हेमत विपीन करन कुनाल कपील बाकलीवाल आदित्य अतीन क्रियांश बाकलीवाल परिवार यांना मिळाला. तर फुलमाळा अर्पण करणाचे सौभाग्य मधुबाला भरत गगवाल यान मिळाला हिराकाका प्रांगण येथे धुप चढविण्याचे सौभाग्य अरून मयूर आकाश पाटननी यांना मिळाला.तर यजमान चे सौभाग्य अलकादेवी अड अनिल राजेश अमोल कासलीवाल परीवार व ताराबाई वदना विनोद श्रेणीक अपुर्वा भाग्यम कासलीवाल परीवार हिराकाका याना मिळाला यावेळेस पचायत अध्यक्ष महावीर पाटनी महावीर ठोले चदा कासलीवाल यतीन ठोले जितेंद्र पाटनी सतोष सेठी प्रमोद पाडे शैलेश चादीवाल सजय पहाडे प्रसाद पाटनी राजकुमार पाडे अपु पाटनी प्रमोद ठोले सुनील सेठी महावीर सेठी श्रीपाल लोहाडे आदीची उपस्थित होती

# ओबीसी जनगणनेसाठी स्वतंत्र रकान्याची मागणी

## हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात काँग्रेस ओबीसी विभागाच्या वतीने निवेदन



**हिंगोली** : आगामी जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाची स्वतंत्र व अचूक नोंद व्हावी, यासाठी जनगणना प्रपत्रात ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करत हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन साद करण्यात आले.

ओबीसी समाजाची जातनिहाय लोकसंख्या तसेच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीची अधिकृत आणि अचूक माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. सध्या ओबीसी समाजाची स्वतंत्र व अचूक लोकसंख्या उपलब्ध नसल्यामुळे आरक्षण, शैक्षणिक संधी, रोजगार, सामाजिक न्यायाच्या योजना तसेच विविध विकासात्मक धोरणांचे नियोजन करताना अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

देशातील मोठ्या सामाजिक घटकांपैकी एक असलेल्या ओबीसी समाजाची वास्तविक लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक परिस्थिती अधिकृत आकडेवारीच्या माध्यमातून समोर येणे गरजेचे आहे. त्यासाठी आगामी जनगणनेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र रकाना ठेवून जातनिहाय माहितीचे शास्त्रीय व अचूक पद्धतीने संकलन करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, माजी जिल्हाध्यक्ष सुरेश अप्पा सराफ, ओबीसी काँग्रेस जिल्हाध्यक्ष भास्करराव पोले, शेतकरी नेते डॉ. रमेशराव शिंदे, जिल्हा सचिव बाजीराव पाटील, युवक काँग्रेस सचिव बंटीभाऊ नागरे, एकनाथ शिंदे, किसनराव जुमडे, रंगराव राठोड, विशाल इंगोले, सुभाष जाधव, आयुबभाई, शेख अफसर, सुमित शिंदे, संदीप कुंडकर, राहुल चाटसे, रत्नदीप गायकवाड, सुरेश राठोड, दीपक सोनुळे आदींसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ओबीसी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या अधिकृतरीत्या समोर यावी, सामाजिक न्यायाच्या धोरणांना ठोस आकडेवारीचा आधार मिळावा आणि आगामी जनगणनेमध्ये ओबीसी समाजाची स्वतंत्र नोंद व्हावी, यासाठी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# गणेशोत्सवाच्या माध्यमातून ‘लोकसंवाद-2026’मधून शासकीय योजनांचा जागर

## परभणी शहरातील विविध गणेश मंडळांमध्ये जिल्हा माहिती कार्यालयाचा उपक्रम; नागरिकांना योजनांच्या लाभाची प्रक्रिया व निकषांची माहिती

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी




**परभणी:** सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने दि. १६ ते २४ सप्टेंबरदरम्यान राज्यभर ‘लोकसंवाद-२०२६’ हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत परभणी जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने शहरातील विविध गणेश मंडळांच्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शासकीय योजनांची माहिती जाणून घेतली.

श्री शिवाजी महाविद्यालय कमानीसमोर हिंदू वॉरियर्स गणेश मित्र मंडळ, शिवराम नगरातील शिव शंभुराजे गणेश मित्र मंडळ, साखला प्लॉट येथील ज्ञानेश्वर नगरातील जय हिंद गणेश मित्र मंडळ, श्री न्यू शिवशक्ती गणेश मित्र मंडळ आणि श्री सिद्धिविनायक गणेश मित्र मंडळ येथे ‘लोकसंवाद-२०२६’ अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी विठ्ठल रनबावरे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक सागर आंबेकर, नगरसेवक श्याम खोबे, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण मानोलीकर, माणिकराव शिंदे यांच्यासह संबंधित गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व मदत कक्ष, क्षयरोगमुक्त भारत अभियान, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी योजनांसाठी असलेले पात्रतेचे निकष, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि लाभ मिळण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आरोग्यविषयक योजनांबाबत मार्गदर्शन करताना आयुष्मान कार्डच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या उपचार सुविधांची माहिती देण्यात आली. विविध आजारांचे निदान, औषधोपचार तसेच शस्त्रक्रियेसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेची माहिती नागरिकांना देण्यात आली. तसेच क्षयरोगाचे निदान, उपचार आणि शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांबाबतही जनजागृती करण्यात आली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांद्वारे उपलब्ध होणाऱ्या आर्थिक सहाय्याची तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहितीही नागरिकांना देण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी संबंधित विभागाशी संपर्क साधून अर्ज करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

गणेश मंडळांकडून सामाजिक उपक्रम

लोकसंवाद उपक्रमासोबतच विविध गणेश मंडळांनी सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले. साखला प्लॉट येथील जय हिंद गणेश मित्र मंडळाच्या वतीने ‘प्रदूषण एक समस्या’ या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच जन आरोग्य योजनेअंतर्गत महाआयडी शिबिर घेण्यात आले असून सुमारे ७० नागरिकांचे आयडी कार्ड काढण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा देखावाही मंडळाच्या वतीने साकारण्यात आला.

श्री सिद्धिविनायक गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष स्वप्नील उगले, उपाध्यक्ष प्रकाश राज कंवर, कोषाध्यक्ष अभिराज राऊत व सल्लागार सचिन सोनटक्के; श्री न्यू शिवशक्ती गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष वैभव क्षीरसागर, उपाध्यक्ष शिव पुरी व कोषाध्यक्ष दशरथ लाड; जय हिंद गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित देवडे व उपाध्यक्ष प्रेम वैद्य यांच्यासह मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

तसेच हिंदू वॉरियर्स गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष माधव थिटे, शिव शंभुराजे गणेश मित्र मंडळ, शिवराम नगरचे अध्यक्ष प्रेम कदम, उपाध्यक्ष अर्जुन काळे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकसंवाद उपक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या या उपक्रमास परिसरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# वनामकृविचे माननीय कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांना ‘बेस्ट व्हाईस-चान्सलर अवॉर्ड-2025’

## कृषि शिक्षण, संशोधन, नवोन्मेष, विस्तार व शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञानातील उल्लेखनीय योगदानाची दखल

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी




**परभणी** :-वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांना कृषि शिक्षण, संशोधन, नवोन्मेष, विस्तार शिक्षण तसेच शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञानाच्या प्रसारातील उल्लेखनीय योगदानाबद्दल ‘बेस्ट व्हाईस-चान्सलर अवॉर्ड-२०२५’ या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ऑल इंडिया ॲग्रीकल्चरल स्टुडंट्स असोसिएशन (एआयएएसए - AIASA) यांच्या वतीने प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार ‘५व्या आंतरराष्ट्रीय ऑरगॅनिक अँड नॅचरल राईस प्रॉडक्शन सिस्टिम्स (ORP-5)’ या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी लक्ष्मीपत सिंघानिया सभागृह, नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. या परिषदेसाठी ऑल इंडिया ॲग्रीकल्चरल स्टुडंट्स असोसिएशन, युनिव्हर्सिटी ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेस, रायचूर आणि इंडोनेशिया येथील आयपीबी विद्यापीठ (IPB University, Indonesia) हे आयोजक सहभागी आहेत.

हा सन्मान माजी केंद्रीय राज्यमंत्री, मानव संसाधन विकास व जलसंसाधने मंत्रालय; नदी विकास व गंगा पुनरुज्जीवन तथा प्रमुख पाहुणे माननीय डॉ. सत्यपाल सिंह, इम्फाळ येथील केंद्रीय कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू पद्मभूषण प्रा. (डॉ.) आर. बी. सिंह, आयोजन समिती अध्यक्ष प्रा. (डॉ.) सहदेव सिंह, एआयएएसएचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. निनाद महाजन, रायचूर कृषी विज्ञान विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. गुरुराज सुंकड, निमॅटोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पंकज, ORP-5 चे आंतरराष्ट्रीय संयोजक प्रा. (डॉ.) स्टेफानो बोच्ची, जपान येथील तोहोकू विद्यापीठाचे प्राध्यापक प्रा. (डॉ.) मिजुहिको निशिदा, AIASA चे आधारस्थंभ डॉ. आर. पी. सिंह, संरक्षक, ORP-5 चे आयोजन सचिव प्रा. वाय. व्ही. सिंह आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुरस्काराच्या प्रशस्तीपत्रात प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाबरोबरच कृषि शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि विस्तार क्षेत्रातील योगदानाची विशेष दखल घेण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ड्रोन तंत्रज्ञान, कृषि यांत्रिकीकरण, शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञान आणि देशभर तंत्रज्ञान हस्तांतरणाला चालना मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच संस्थात्मक विकास, संशोधन भागीदारी, पायाभूत सुविधांचा विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि कॉर्पोरेट सामाजिक दायित्वाच्या (CSR) माध्यमातून मिळविलेला भरीव निधी यामध्ये त्यांच्या नेतृत्वाची प्रशंसा करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या २,००० एकरांपेक्षा अधिक पडीक जमिनीचे उत्पादक कृषि क्षेत्रात रूपांतर करण्याच्या कार्याचीही प्रशस्तीपत्रात विशेष नोंद घेण्यात आली आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत सेंद्रिय तांदूळ उत्पादन प्रणालीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यांत्रिकीकरण आणि डिजिटल बुद्धिमत्ता (AI-Driven Mechanisation and Digital Intelligence for Organic Rice Production Systems)’ या थीम VII वरील तांत्रिक सत्राच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भूषविली. या सत्रात सेंद्रिय तांदूळ उत्पादन प्रणालीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, कृषि यांत्रिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान, अचूक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यासंदर्भात विविध विषयांवर तज्ज्ञांनी चर्चा केली.

प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये कृषि शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण, डिजिटल कृषि, हवामान-स्मार्ट कृषि, कृषि यांत्रिकीकरण आणि शेतकरी-केंद्रित तंत्रज्ञान यांना विशेष चालना देण्यात येत आहे. त्यांच्या या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत ‘बेस्ट व्हाईस-चान्सलर अवॉर्ड-२०२५’ हा सन्मान प्राप्त झाल्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.

या पुरस्काराबद्दल विद्यापीठाचे अधिकारी, संचालक, अधिष्ठाता, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच कृषि क्षेत्रातील विविध घटकांकडून माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## 3,200 मेगावॅट आसाम प्रकल्पाची पायाभरणी

मुंबई: आसामचे माननीय मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांच्या हस्ते आज आसामच्या खालच्या भागातील धुबरी जिल्ह्यातील छपार येथे अदाणी पॉवर लिमिटेड (एपीएल) च्या 3,200 मेगावॅट क्षमतेच्या अल्ट्रा-सुपरक्रिटिकल थर्मल पॉवर प्लांट (यूएसटीपीपी) प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली.

## बिस्पोक एआय अप्लायन्सेसची श्रेणी लाँच

गुरुग्राम - सॅमसंग इंडियाने आज आपल्या २०२६ बिस्पोक एआय अप्लायन्सेस लाइनअप लाँच केली, जी ग्राहकांचे जीवन अधिक समृद्ध आणि सुलभ करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. ‘द ब्रीफ गुरुग्राम' या अत्याधुनिक अनुभवात्मक इव्हेण्टमध्ये सॅमसंगने दाखवून दिले की, एआय विविध उत्पादन श्रेणींमधील एक समान धागा म्हणून कार्य करतो, ज्यामध्ये स्मार्टथिंग्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सवयी शिकून घेणे,

## महाराष्ट्रभर "हिरकणी कक्ष" लॅक्टेशन पॉड्स सुरु केले

मुंबई, 17 सप्टेंबर 2026: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) सोबत सामंजस्य करार (एमओयू) करून "हिरकणी कक्ष" (लॅक्टेशन पॉड्स) हा महिलांसाठी महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे. हा परिवर्तनशील आणि लिंग-संवेदनशील उपक्रम स्तनपान करणाऱ्या मातांना मदत करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिला प्रवाशांच्या सुरक्षितता आणि सन्मान वाढविण्यासाठी राबविण्यात आला आहे.

## नवीन क्रेडिट कार्ड्सवर 'झिरो फॉरेक्स मार्कअप'

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने प्रथम ग्राहकांना प्राधान्य या आपल्या धोरणांतर्गत आपल्या सर्व हयात आणि नवीन क्रेडिट कार्ड ग्राहकांसाठी विनाअट 'झिरो फॉरेक्स मार्कअप' देणारी भारतातील पहिली बँक ठरली आहे. बँकेच्या सर्व कार्डधारकांना हा फायदा आपोआप मिळणारा आहे. ग्राहकांना यासाठी नवीन कार्डसाठी अर्ज करण्याची, त्यांचे सध्याचे कार्ड अदयावत करण्याची किंवा कोणत्याही ठराविक रक्कमेची खरेदी करणे यासारख्या अटींची सक्ती करण्यात आलेली नाही. त्यांना सध्याच्या आयडीएफसी फर्स्ट बँक क्रेडिट कार्डवर आता विनाअट 'झिरो फॉरेक्स मार्कअप' सुविधा मिळते.

## भारताच्या पवन ऊर्जा क्षेत्राची 100 गिगावॅटकडे वाटचाल

मुंबई — आपल्या मूळ स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टासोबतच एक औद्योगिक आणि निर्यात शक्ती म्हणून वेगाने विकसित होत असलेले भारताचे पवन ऊर्जा क्षेत्र विंडर्जी इंडिया 2026 मध्ये केंद्रस्थानी असेल. "पवन – भारताच्या ऊर्जा लवचिकतेला बळ देणे" या संकल्पनेवर आधारित हा ऐतिहासिक 8वा अंक देशाच्या नवीकरणीय ऊर्जा परिदृश्यात अभूतपूर्व गतीच्या काळात आयोजित होत आहे. "भारताचे ऊर्जा संक्रमण आता केवळ मेगावॅट जोडण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. हे एक संपूर्ण औद्योगिक परिसंस्था उभारण्याबद्दल आहे — जी कुशल रोजगार निर्माण करते, उत्पादन निर्यातीला चालना देते, ऊर्जा सुरक्षिततेची हमी देते आणि आयातित व अस्थिर जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करून प्रणाली खर्च कमी करते," असे श्री. राजेश कुलहरी, सह-सचिव, एमएनआरई यांनी सांगितले.

## डिजिटल स्टोरीटेलिंग आणि प्रत्यक्ष कार्यक्रमांद्वारे एका ओळखीच्या सण-परंपरेला नवीन रूपात सादर

मुंबई, : प्रत्येक गणेशोत्सवात, गणेशभक्त श्री गणेशाचे वाहन असलेल्या मूषकाच्या कानात आपली इच्छा व्यक्त करतात आणि आपली प्रार्थना बाप्पापर्यंत पोहोचवण्यावर विश्वास ठेवतात. यावर्षी, प्रेफर गणपतीच्या या आवडत्या श्रोत्याला एक नवीन जबाबदारी देत आहे. केवळ इच्छा ऐकणेच नाही, तर लोकांनी प्रत्यक्षात आणायच्या ठरवलेल्या योजना (प्लॅन्स) देखील ऐकणे. "विश करा. प्रेफर करा." या संकल्पनेवर आधारित, प्रेफरचे ११ दिवसांचे मूषक लोन ( अभियान या लोकप्रिय सण-परंपरेतून प्रेरणा घेऊन पैसे, योजना आणि कर्जाची उपलब्धता या विषयांवर अधिक सोप्या आणि मानवी दृष्टिकोनातून सोप्प्या असे संवाद साधण्यास सुरुवात करत आहे.

## पेट्रोल पंपवर मोठ्या युपीआय व्यवहारांसाठी केवळ ₹5 MDR

नागपूर- इंधन खरेदीसाठी पेट्रोल पंप चालकांसाठी विशेष आणि सवलतीची एमडीआर व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे ते कमी आणि ठराविक खर्चात युपीआय पेमेंट स्वीकारणे सुरू ठेवू शकतील. महत्त्वाचे म्हणजे, हे चार्ज क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि वॉलेटसारख्या इतर पेमेंट माध्यमांवरील चार्जच्या तुलनेत खूपच कमी आहेत. ग्राहकांनी काय जाणून घ्यावे ग्राहकांसाठी युपीआय पेमेंट पूर्वीप्रमाणेच मोफत राहील. ग्राहकांना त्यांनी खरेदी केलेल्या इंधनाच्या किमतीएवढीच रक्कम द्यावी लागेल.

## आकर्षक कलर फ्युजन डिझाइनसह एआय प्लस नोव्हा 2 पॉवर 5जी बाजारात

नवी दिल्ली : एआय प्लस ने नोव्हा 2सिरीज मधील नवीनतम स्मार्टफोन नोव्हा 2 पॉवर 5जी लाँच केला आहे. अत्याधुनिक डिझाइन, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी पॉवर यांचा संगम असलेला हा स्मार्टफोन तंत्रज्ञानप्रेमी नव्या पिढीच्या गरजा लक्षात घेऊन सादर करण्यात आला आहे. पारंपरिक स्मार्टफोन लॉन्चच्या पद्धतीपेक्षा वेगळ्या आणि अनोख्या पद्धतीने, नोव्हा 2 पॉवर ने नवी दिल्लीतील रॅम्पवर पदार्पण करत फॅशन आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम सादर केला. आधुनिक रॅम्प लुक्समध्ये हा स्मार्टफोन समाविष्ट करण्यात आला होता, ज्यातून तो केवळ तंत्रज्ञानाचे उपकरण नसून स्टायलिश ॲक्सेसरी म्हणूनही आपली ओळख अधोरेखित करतो.

## किसनाच्या जळगाव शोरूममध्ये जुन्या सोन्यावर डायमंड खरेदीसाठी 105% मूल्य

जळगाव : किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने महाराष्ट्रातील जळगाव येथे (जेडीसीसी बँकेसमोर, दीनानाथ वाडी, रिंग रोड) आपल्या ११ व्या विशेष शोरूमच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यसभा खासदार आणि विशेष सरकारी वकील माननीय ॲड. उज्ज्वल निकम जी आणि 'हरी कृष्ण ग्रुप'चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक श्री. घनश्याम ढोलकिया यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याला श्रीमती रक्षा खडसे, केंद्रीय राज्यमंत्री (युवा व्यवहार आणि क्रीडा), भारत सरकार; श्री. गुलाबराव पाटील, पाणीपुरवठा मंत्री आणि पालकमंत्री, जळगाव; श्री. गिरीश महाजन, जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र शासन; तसेच श्री. संजय सावकारे, वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र शासन यांची प्रमुख उपस्थिती होती.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँककडून ‘मूषक आला रे' उपक्रम

पुणे : यंदाच्या गणेशोत्सवात उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक ‘मूषक आला रे' उपक्रमाच्या माध्यमातून बाप्पाला भाविकांच्या अधिक जवळ घेऊन येत आहे. गणपती बाप्पाचा लाडका मूषक भाविकांच्या मनातील इच्छा बाप्पापर्यंत पोहोचवतो, या श्रद्धेवर आधारित हा उपक्रम आखण्यात आला आहे.हा उपक्रम गणेशोत्सवाचा आनंद अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक बनवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक अडचणींमुळे गर्दीच्या मंडपांना भेट देणे कठीण जाणाऱ्या व्यक्तींसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

# विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची सूत्रे डॉ. संजय कवडेंच्या हाती!

## डॉ. प्रशांत अमृतकर यांचा राजीनामा; पूर्णवेळ कुलसचिव निवडीपर्यंत कार्यवाहक म्हणून जबाबदारी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची सूत्रे मंगळवारी (दि. २२) डॉ. संजय साहेबराव कवडे यांनी स्वीकारली. तत्कालीन कार्यवाहक कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर यांच्याकडून त्यांनी पदभार घेतला. पूर्णवेळ कुलसचिवाची निवड होईपर्यंत डॉ. कवडे यांच्याकडे या पदाची जबाबदारी राहणार आहे. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या नियुक्तीनंतर ही प्रशासकीय बदलाची प्रक्रिया पार पडली.

**डॉ. अमृतकरांचा राजीनामा; कवडेंची नियुक्ती**

विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रशांत अमृतकर यांनी पूर्णवेळ कुलसचिवपदासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे कार्यवाहक कुलसचिवपदाचा त्यांनी सोमवारी (दि. २१) राजीनामा दिला. त्यानंतर रिक्त झालेल्या पदाची जबाबदारी डॉ. संजय कवडे यांच्याकडे सोपविण्यात आली.

आस्थापना विभागाच्या वतीने सोमवारी सायंकाळी डॉ. कवडे यांची 'ऑफिशिएटिंग कुलसचिव' म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र काढण्यात आले. या पत्रानुसार मंगळवारी त्यांनी डॉ. अमृतकर यांच्याकडून पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारण्याच्या वेळी कार्यकारी अभियंता रविंद्र काळे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. सुभाष चव्हाण, उपकुलसचिव डॉ. विष्णु कऱ्हाळे, डॉ. संजय शिंदे, भगवान फड, कुलसचिव कार्यालयातील डॉ. मीरा मस्के, अब्दुल सलाम महसूलदार आदी उपस्थित होते.

**२१ वर्षांचा विद्यापीठातील प्रशासकीय अनुभव**



डॉ. संजय कवडे हे गेल्या २१ वर्षांपासून विद्यापीठाच्या सेवेत कार्यरत आहेत. या कालावधीत त्यांनी कक्षाधिकारी, सहाय्यक कुलसचिव, उपकुलसचिव तसेच वित्त व लेखाधिकारी अशा विविध प्रशासकीय पदांवर काम केले आहे. वाणिज्यशास्त्र विद्याशाखेत त्यांनी पीएच.डी. प्राप्त केली असून, भारतीय जीवन विमा निगममध्ये विकास अधिकारी म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.

प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉ. कवडे यांच्याकडे आता विद्यापीठाच्या कुलसचिवपदाची तात्पुरती जबाबदारी आली आहे. पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. कवडे आणि डॉ. अमृतकर यांनी कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांची भेट घेऊन आभार मानले.

**डॉ. अमृतकरांची दोन वर्षे आठ महिन्यांची कारकीर्द**

डॉ. प्रशांत अमृतकर यांनी १९ जानेवारी २०२४ ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विद्यापीठाचे कार्यवाहक कुलसचिव म्हणून जबाबदारी सांभाळली. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कार्यकाळात शिक्षकांच्या पदोन्नती कॅम्पचे आयोजन, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियमित पदोन्नती तसेच दोन वर्षे तासिका तत्त्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांची निवडप्रक्रिया पार पडली.

विद्यापीठातील ७३ शिक्षक पदांच्या भरतीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. याशिवाय सेवक कल्याण निधी, विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन, पीएम उषा प्रकल्प आणि एनआयआरएफ यांसारख्या महत्त्वाच्या कामांमध्येही त्यांनी कुलसचिव म्हणून कार्य केले.

कुलसचिवपदाची सूत्रे सोडल्यानंतर आता डॉ. अमृतकर पूर्णवेळ कुलसचिवपदाच्या निवड प्रक्रियेत उमेदवार म्हणून सहभागी आहेत.

विद्यापीठाच्या कुलसचिव आणि धाराशिव उपपरिसर संचालक या पूर्णवेळ पदांसाठी १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या कालावधीत आवेदन मागविण्यात आले होते. कुलसचिवपदासाठी एकूण १८ उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज दाखल केले आहेत. तर धाराशिव उपपरिसर संचालकपदासाठी १४ उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज केले आहेत. अर्जांची हार्ड कॉपी जमा करण्याची अंतिम मुदत २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आहे. त्यामुळे अंतिम छाननीनंतर दोन्ही पदांसाठी आलेल्या अर्जांची संख्या स्पष्ट होणार आहे.

**चार वर्षांपासून प्रभारी कुलसचिव :** विद्यापीठाच्या कुलसचिवपदावर पूर्णवेळ नियुक्तीचा प्रश्न गेल्या काही काळापासून प्रलंबित आहे. डॉ. जयश्री सूर्यवंशी यांनी राजीनामा दिल्यानंतर सप्टेंबर २०२२ पासून या पदावर प्रभारी नियुक्त्या करण्यात येत आहेत. आता पूर्णवेळ कुलसचिव निवडीची प्रक्रिया सुरू असताना डॉ. संजय कवडे यांच्याकडे कार्यवाहक कुलसचिवपदाची सूत्रे सोपविण्यात आली आहेत.

# तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत सलीम उर्दू शाळेचे चार विद्यार्थी प्रथमस्थानी



**अजिंठा प्रतिनिधी :** सवित्रीबाई फुले विद्यालय उंडणगांव येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत शिवना येथील सलीम उर्दू हायस्कुल & ज्यु कॉलेजच्या विदर्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करताना चार विविध वजन गटात प्रथम क्रमांक पटकवला. चौदा वर्षाखालील गटात शेख अफफान साबेर प्रथम, सतरा वर्षाखालील गटात शेख बिलाल नासेर प्रथम, एकोणीस वर्षाखालील गटात 55 किलो वजनगटात शेख अरफात हकीम प्रथम, 72 किलोवजन गटात शेख रिजवान साबीर प्रथम आला आहे.

कुस्ती चे मुख्य मार्गदशक नाजीम कुरेशी पेहलवान, मुंतजीम अन्सारी पेहलवान, आरिफ पठाण पेहलवान यांचे या खेळाडूंना विशेष मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक मो शाकीर, क्रीडाशिक्षक पठाण यहीयाखान यांनी विशेष कौतुक केले.

# जन्म-मृत्यू प्रमाणपत्र आता मिळणार ऑनलाइन; नागरिकांची कटकट मिटणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक अमोल येडगे यांनी आज झोन क्रमांक ८ कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी करत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यादरम्यान नागरिकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत.

जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांना महापालिका कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची किंवा ताटकळत बघाण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी अर्ज स्वीकारण्यापासून ते आवश्यक शुल्क भरण्याची संपूर्ण सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. ही प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने अधिक सुलभ, वेगवान आणि पारदर्शक करण्यावर विशेष भर देण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना घराबहुतेक किंवा एका क्लिकवर सर्व सेवा जलद मिळाव्यात यासाठी तातडीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचे आदेशही आयुक्तांनी यावेळी दिले. या पाहणी आणि आढावा बैठकीदरम्यान झोन क्रमांक ८ चे संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुर्वेद दिनानिमित्त जिल्हाभरात आज विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आयुर्वेद दिनानिमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांच्या पुढाकाराने जिल्हा आयुष कक्षाच्या वतीने आज, २३ सप्टेंबर रोजी जिल्हाभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शासकीय आयुर्वेदिक व युनानी दवाखाने, आयुष्मान आरोग्य मंदिरे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुर्वेदाविषयी माहितीपर कार्यक्रम आणि आरोग्य शिबिरे घेण्यात येणार आहेत.

एकात्मिक आरोग्य सेवा, संशोधन व नावीन्यता, समुदाय कल्याण आणि शाश्वत जीवनशैली या तीन प्रमुख उपसंकल्पनांवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये आयोजित शिबिरांसाठी तज्ज्ञ वैद्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या शिबिरांमध्ये स्नेहन, स्वेदन, रक्तमोक्षण आणि हिजामा यांसारख्या पंचकर्म उपचारांचा रुग्णांना मोफत लाभ दिला जाणार आहे.

आयुष क्षेत्राच्या विस्तारासाठी जिल्ह्यात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. पैठण, खुलताबाद आणि फुलंब्री येथे प्रत्येकी ३० खाटांची आयुष रुग्णालये स्थापन करण्यासाठी जिल्हास्तरावरून तयार करण्यात आलेल्या प्रस्तावाला जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आयुष उपचारांची सुविधा अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आयुर्वेद उपचारांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता वाढत असून उपचारांची मागणीही वाढत आहे. वाढती लोकसंख्या आणि ग्रामीण भागातील गरज लक्षात घेऊन जिल्ह्यात ३७ नवीन आयुष दवाखाने सुरू करण्याच्या प्रस्तावालाही जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. तसेच पुढील महिन्यात जिल्ह्यात १० सॅटेलाईट आयुष दवाखाने कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण नागरिकांना त्यांच्या जवळच्या परिसरात आयुष उपचार उपलब्ध होणार आहेत.

# एमजीएम विद्यापीठाचा पाचवा दीक्षांत समारंभ 26 सप्टेंबरला

## डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. आ. ह. साळुंखे यांना मानद पदव्या; 1,991 विद्यार्थ्यांना पदवी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा पाचवा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एमजीएम स्पोर्ट्स स्टेडियम येथे होणार आहे. भारत सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयांतर्गत पेटंट्स, डिझाइन्स अँड ट्रेड मार्क्स विभागाचे नियंत्रक जनरल प्रो. डॉ. उन्नत पंडित हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून दीक्षांत भाषण करणार आहेत. यावेळी प्रख्यात वैज्ञानिक पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांना मानद डी. लिट. पदवी प्रदान करण्यात येणार आहे. एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलपती अंकुशराव कदम, नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्या परिषदेचे सदस्य या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी ही माहिती दिली.



२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या एकूण १,९९१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. यात ४८ पीएच.डी., ४३० पदव्युत्तर पदवी, १,३९२ पदवी, ३४ पदव्युत्तर पदविका, ७६ पदविका आणि ११ प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेतील ८५६, मूलभूत व उपयोजित विज्ञानातील ३५०, व्यवस्थापन व वाणिज्यातील ४४७, सामाजिक शास्त्रे व मानव्य विद्येतील २२३, प्रयोगकलांतील १५, आंतरविद्याशाखीय शिक्षणातील ३५ आणि डिझाइन शाखेतील ६५ विद्यार्थी पदवी घेणार आहेत.

**१४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक :** दीक्षांत समारंभात १४ विद्यार्थ्यांना विविध सुवर्णपदकांनी गौरविण्यात येणार आहे. पदवीतील चार व पदव्युत्तर पदवीतील सहा विद्यार्थ्यांना कुलपती सुवर्णपदक मिळणार आहे. याशिवाय स्थापत्य अभियांत्रिकीतील गुणवंत विद्यार्थ्याला जेएनईसीच्या १९९०-९१ बॅचकडून सुवर्णपदक, दोन विद्यार्थ्यांना प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सुवर्णपदक, तर एका विद्यार्थ्याला कै. चंदा मारोती खराबे स्मृती सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी :** २०१९ पासून कार्यरत असलेल्या एमजीएम विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने बहुविद्याशाखीय व कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला आहे. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर शिक्षणासोबत बहु-प्रवेश व बहु-निर्गमनाची सुविधा, इंटर्नशिप, क्षेत्रीय प्रकल्प, कौशल्य अभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. विविध विद्याशाखांमध्ये अभियांत्रिकी, व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र, पत्रकारिता, फॉरेन्सिक सायन्स, फार्मसी, विधी, योग, डिझाइन आदी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

# सोयगाव ता. ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी सुनील दामोदर



**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांचा लढा अधिक तीव्र करण्यासाठी सोयगाव तालुका ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी श्री सुनील भाऊ दामोदर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे तालुक्यातील सर्व ग्रामरोजगार सेवकांनी एकमताने ठराव मंजूर करून त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे

या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विनोदजी चव्हाण माजी तालुकाध्यक्ष राजूभाऊ जाधव जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद पवार जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संदीप जाधव तालुका संघटक प्रताप उबाळे तालुका सचिव मिलिंद संसारे तालुका उपाध्यक्ष राहुल राठोड आदी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले

# न्हावा येथील ओएनजीसी कामगारांवरील विघ्न 'सुखकर्ता' दूर करणार : महेंद्रशेठ घरत

## न्हावा येथील ओएनजीसीच्या कामगारांचे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड -पनवेल तालुक्यातील न्हावा येथील ओएनजीसी कंपनीत अनेक वर्षे कामगार कंत्राटी पद्धतीने काम करतात; परंतु १७ कंत्राटी कामगारांना कामावरून अचानक काढले आहे. त्यामुळे सुमारे ६०० कामगारांनी सहा दिवसांपासून बेमुदत संप पुकारला असून ठिय्या आंदोलन सुरू आहे. न्हावा ग्रामस्थ रस्त्यावर उतरले आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी सोमवारी (ता. २१) न्हावा येथे कामगारांशी संवाद साधला आणि कामगारांना योग्य न्याय दिला जाईल, असे आश्वासन दिले. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "ओएनजीसीचे न्हावा येथील प्रशासन मुर्दाड आहे. कंत्राटी कामगारांना कायम करण्याऐवजी कामावरून काढून टाकणे, ठेकेदारांना पोसणे, याचा मी जाहीर निषेध करतो. प्रशासनाने ऐन गणेशोत्सवात कामगारांना रस्त्यावर यायला भाग पाडले आहे; परंतु विघ्नहर्ता गणेश कामगारांवरील हे संकट दूर करेल. कामगारांच्या पाठीशी मी सर्व शक्ती पणाला लावेन. न्हावा ग्रामस्थ राजकीय चपला बाजूला ठेवून एक झाले आहेत. आया-बहिणींचा खंबीर पाठिंबा आहे. त्यामुळे ओएनजीसी प्रशासनाला वठणीवर आणणारच. कारण न्हावा गावाने एकेकाळी अनेकांना रोजगार दिला आहे. त्यामुळे आज येथील स्थानिक भूमिपुत्र कामगारांवरील अन्याय कधीही खपवून घेतला जाणार नाही. ओएनजीसीच्या मग्रूर प्रशासनाने

१७ स्थानिक कामगारांना तातडीने कामावर घ्यावे. अन्यथा आंदोलन तीव्र केले जाईल." असे मत व्यक्त करत कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी आक्रमक भूमिका घेतली.१७ कामगारांना व्यवस्थापनाने तातडीने कामावर घ्यावे आणि तसे लेखी पत्र कामगार संघटनेला द्यावे, अशीही कामगारांची मागणी आहे.

# राजकुंवर महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्साहात साजरी



फर्दापूर - बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करून तळागाळातील आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्याचे महान कार्य करणारे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती राजकुंवर महाविद्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ ए जे बेडवला सर यांच्या शुभहस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला व विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रेरणादायी सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यामध्ये प्रामुख्याने खालील मान्यवरांची उपस्थिती होती प्रा बिराडे प्रा पाटील प्रा शेळके प्रा सपकाळ प्रा शिंदे गव्हाणे मानकर सोनावणे महाजन लोखंडे चव्हाण आणि राजपूत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा पोल मॅडमयांनी अतिशय उत्तम रित्या केले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रा सोनावणे सर यांनी मानले

# संत महानतांच्या आश्रमातील मदतीसाठी धर्म साहाय्यता कक्षाच्या माध्यमातून मदतीचा हात. सुदर्शन महाराज कपाटे

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर प्रतिनिधी .छत्रपती संभाजी नगर पैठण रोड येथील मानभाव आश्रम श्रीकृष्ण मंदिर मुनिश्री सुदर्शन महाराज कपाटे धर्म सहाय्यता कक्ष च्या वतीने चालू असलेल्या मराठवाडा भरातील सर्व हिंदू धर्मीय साधुसंत महंत यांच्या विविध आश्रमामध्ये चालू असलेले कामासंबंधी येणाऱ्या अडीअडचणीच्या बाबतीत चर्चा मार्गदर्शन होत असून यासाठी अनेक संत महंत त्यांच्या भेटीगाठी घेऊन मोठ्या प्रमाणात मदत कार्य करत आहे. आज दि. २२. रोजी साध्वी महंत भावत दास त्यागी ( विजया देवी) श्री पंचमुखी हनुमान आश्रम खाबळे तालुका त्र्यंबकेश्वर या ठिकाणी होणार असलेल्या कुंभमेळ्यासंदर्भातील काही संत महानतांच्या अडचणी बाबतीत महंत कपाटे यांच्याशी चर्चा करून समाधान व्यक्त केले व लवकरच त्र्यंबकेश्वर येथे येण्यासाठी निमंत्रित केले यावेळी ह भ प नारायण बांबर्डे सतोष करपे पाटील. अँड प्रमोद मिठा इंदुरकर यांची उपस्थिती होती

# मंडळाची विभागीय भांडारे व्यवहार बंद राहतील

छत्रपती संभाजीनगर, दि. 22 (विमाका) :- पाठयपुस्तक मंडळाकडे नोंदणीकृत झालेल्या सर्व मुद्रक बांधणीकार व पुस्तक विक्रेते तसेच शैक्षणिक संस्था इत्यादींना कळविण्यात येते की, दिनांक 28 सप्टेंबर, 2026 ते दि.02 ऑक्टोबर, 2026 या कालावधीत पुस्तके व कागदपत्राची प्रत्यक्ष साठा मोजणी होणार असल्याने या कालावधीत मंडळाची विभागीय भांडारे गोरेगाव, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिक, कोल्हापूर, पनवेल व अमरावती येथील सर्व व्यवहार (आवक-जावक, विक्री इत्यादी) बंद राहतील. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे, असे भांडार व्यवस्थापक, पाठयपुस्तक भांडार व वितरण केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# महिंद्रातर्फे एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स श्रेणीचा विस्तार

मुंबई: महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने आज एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स एज सादर करण्याची घोषणा केली. त्याची सुरुवातीची किंमत 9.39 लाख रु. आहे. यामुळे प्रीमियम वैशिष्ट्ये ग्राहकांसाठी अधिक सुलभ झाली असून ग्राहकांना मिळणाऱ्या मूल्याची नवी उंची निश्चित झाली आहे. जोडीला कंपनीने पेट्रोल ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह एक्सयूवी 3एक्सओ रेवएक्स एम(ओ) देखील सादर केली आहे.2024 मध्ये सादर झाल्यापासून एक्सयूवी 3एक्सओ ने अत्याधुनिक एसयूव्ही ग्राहकांच्या अपेक्षांपलीकडे कामगिरी केली आहे. आपल्या वेगळ्या आणि उठावदार डिझाइनसह, प्रीमियम इंटीरियर, आरामदायी राइड, अत्याधुनिक तंत्रज्ञान, रोमांचक कामगिरी आणि अतुलनीय सुरक्षेमुळे ती खऱ्या अर्थाने या श्रेणीतील बदल घडवून आणणारी एसयूव्ही ठरली आहे.

# गणेशोत्सवातून समाजप्रबोधनाचा संदेश; विघ्नहर्ता युवा प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

## ह.भ.प. प्रदीप महाराज जगताप यांच्या प्रभावी व्याख्यानाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीर

ता. सिल्लोड गणेशोत्सव म्हटले की डोळ्यांसमोर येतो तो रोषणाईचा झगमगाट, आकर्षक सजावट आणि अनावश्यक खर्च; मात्र या पारंपरिक संकल्पनेला फाटा देत वाघेरा येथील विघ्नहर्ता युवा प्रतिष्ठानने गणेशोत्सवाला सामाजिक प्रबोधनाची दिशा देत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. यंदाच्या उत्सवात भंपक व अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात आल्याने प्रतिष्ठानचे तालुकाभरातून कौतुक होत आहे.

गणेशोत्सवानिमित्त प्रतिष्ठानच्या वतीने प्रसिद्ध शिवशंभू व्याख्याते तथा युवा कीर्तनकार ह.भ.प. प्रदीप महाराज जगताप, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. २० नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाला वाघेरा तसेच परिसरातील ग्रामस्थ, युवक व गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रदीप महाराज जगताप यांनी आपल्या प्रभावी व ओघवत्या वक्तृत्वातून गणेशोत्सवाचे धार्मिक व सामाजिक महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी चरित्र, युवा पिढीची जबाबदारी आणि समाजातील एकोपा या विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन



केले. त्यांच्या विचारांची प्रभावी मांडणी आणि जोशपूर्ण वक्तृत्वाने उपस्थित श्रोते भारावून गेले.

गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता समाजजागृती, संस्कार आणि प्रबोधनाचे माध्यम बनला पाहिजे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन युवा पिढीने सामाजिक बांधिलकी जपत समाजहितासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही प्रदीप महाराजांनी केले.प्रबोधनात्मक गणेशोत्सवातून प्रतिष्ठानने निर्माण केला आदर्श विघ्नहर्ता युवा प्रतिष्ठानने यंदा दिखावा आणि भंपक खर्चाला दूर ठेवत समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करून गणेशोत्सव साजरा करण्याची विधायक परंपरा निर्माण केली आहे. युवकांनी एकत्र येऊन उत्सवाच्या माध्यमातून समाजाला काहीतरी सकारात्मक देण्याचा घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद ठरत आहे.गणेशोत्सवाच्या माध्यमातून संस्कार, प्रबोधन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न तालुक्यात चर्चेचा विषय ठरत असून, इतर गणेश मंडळांसाठीही तो प्रेरणादायी ठरत आहे. उत्सवातील अनावश्यक खर्चाला आळा घालून त्याच निधीचा व वेळेचा उपयोग समाजहिताच्या उपक्रमांसाठी करण्याची प्रतिष्ठानची भूमिका ग्रामस्थांच्या पसंतीस उतरली आहे.विघ्नहर्ता युवा प्रतिष्ठानच्या या विधायक वाटचालीचे ग्रामस्थांकडून विशेष कौतुक होत असून, उत्सव साजरा करताना सामाजिक भान कसे जपावे, याचा आदर्श वाघेरा येथील या युवा मंडळाने घालून दिला असल्याची भावना व्यक्त होत आहे.यावेळी शिवणा येथील समाजसेवक युवा उद्योजक रामेश्वर काळे पाटील,शिवतीर्थ जळकी बाजाराचे युवा उद्योजक उमेश दांडगे पाटील यांची कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ऋषिकेश जाधव, उपाध्यक्ष आकाश पाटील बारोटे यांच्यासह,अजित जाधव,दीपक गुंड,रोहित कानडजे,रामेश्वर काळे,समाधान जाधव,ज्ञानेश्वर तराळ,विष्णू गुंड,हर्षल करपे,शिवम सोनवणे,आकाश सनांनसे व सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# आचारसंहिता लागू! औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची रणधुमाळी सुरू, 23 ऑक्टोबरला मतदान

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र विधान परिषदेच्या आगामी द्वैवार्षिक निवडणुकांचा बिगूल वाजला असून, यात औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाचाही समावेश आहे. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केल्यामुळे संबंधित आठ जिल्ह्यांमध्ये तत्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या कडक निर्देशानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाणार असून, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी याविषयीची सविस्तर माहिती दिली आहे. जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमा अनुसार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचा तपशीलवार घटनाक्रम पाहता, २२ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ६ ऑक्टोबर ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे, तर ७ ऑक्टोबर रोजी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केली जाईल. यानंतर ९ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी हाती घेतली जाईल आणि ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया आगामी ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण केली जाणार आहे. या निवडणुकीसाठी लागू झालेली आदर्श आचारसंहिता २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर संपुष्टात येईल.

आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी आणि निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. २३ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात ही बैठक होणार असून, विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या या बैठकीस संबंधित राजकीय पक्षांच्या विभागस्तरीय अध्यक्ष व सचिवांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बैठकीमध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाचे जिल्हानिहाय निवडणूक कामकाज, आचारसंहितेचे काटेकोर पालन आणि निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील अन्य आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

महाराष्ट्रात एकूण तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांसाठी ही द्वैवार्षिक निवडणूक होत आहे. या संपूर्ण निवडणुकीच्या व्यवस्थेसाठी जिल्हाधिकारी तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी, ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ यांच्या माध्यमातून आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही वेगाने पूर्ण करण्यात येत आहे. निवडणुका निष्पक्ष आणि शांततपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, राजकीय पक्ष व नागरिकांनीही आचारसंहितेचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शेतपिकांची शिवसेना नेते - आ.अंबादास दानवेंनी केली पाहणी

## राज्य सरकारने तातडीने नुकसानभरपाई देण्याची केली मागणी



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** पावसाने मोठा खंड दिल्याने करपलेल्या शेतपिकांची शिवसेना नेते, आमदार तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंगळवार, 22 सप्टेंबर रोजी वैजापूर व कन्नड तालुक्यांतील विविध गावांमध्ये प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. खंडाळा, शिऊर आणि कानडगाव येथे दानवे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या नुकसानीची माहिती घेतली.

पावसाचा प्रदीर्घ खंड आणि पिकांचे झालेले नुकसान लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने केवळ पाहणी आणि पंचनाम्यांपुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी. कर्नाटकच्या धर्तीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी मोठ्या संकटात असून सरकारने तातडीने निर्णय घेऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अंबादास दानवे यांनी केली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याची भूमिका दानवे यांनी मांडली. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख बबन जाधव, तालुकाप्रमुख संजय मोटे, जिल्हा परिषद सदस्य संजय निकम, कल्याण चव्हाण, रमेश सावंत, विठ्ठल डमाळे, चांगदेव सावडे व भिकन सोमासे उपस्थित होते.

# तरुणांमधली मोबाईलचा अतिरिक्त वापर पालकांना चिंता निर्माण करणारा - प्रशांत गोंदकर

**शिर्डी (प्रतिनिधी) :** तरुणांमध्ये मोबाईलचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे मुलांना मैदानी खेळांची विसर पडत असून लहान कमी वयातच मधुमेह, नेत्र व मेंदू , लठ्ठपणा अशा विविध आजाराच्या गंभीर समस्येमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळून मैदानी खेळाला प्राधान्य देणे काळाची गरज झाली असल्याचे मत शिर्डीतील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गोंदकर यांनी व्यक्त केली आहे. मोबाईलचा होत असलेला अतिरिक्त वापर याबाबत बोलताना प्रशांत गोंदकर म्हणाले देशाची तरुण पिढी ही देशाची शक्ती असते, तरुणच देशाची, कुटुंबाची प्रगती करू शकतात, कोरोना काळात ऑनलाइन शिक्षण पद्धती, झूम मीटिंग उदयास आली, गरीब, श्रीमंत, मध्यमवर्गीय यांनी स्वतःच्या मूलभूत गरजा बाजूला ठेवून शाळेत जाणाऱ्या मुलांना प्राधान्याने अँड्रॉइड मोबाईल घेऊन दिले, मुलं पण मोबाईलवर अभ्यास करायला लागली, अभ्यास झाल्यानंतर कळत नकळत मोबाईलवर रिल्स बघणे, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम इतर ॲप डाऊनलोड करून नवीन नवीन मित्र, मैत्रिणी जॉईन झाले, अभ्यासाचा मूळ हेतू बाजूला राहिला, गेम्स खेळणे व इतर मोबाईल वापरात जास्त वेळ जाऊ लागला परिणामी मैदानी खेळाला विसर पडला कोरोना काळ संपला शाळा पूर्वत चालू झाल्या परंतु मुलांच्या हातात आलेला मोबाईल हातातून सुटला नाही, कोरोना काळातील बहुतांश विद्यार्थी आज तरुण झालेले आहेत.

# देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाच्या आरतीला महापौरांसह नगरसेवकांची उपस्थिती

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित श्री गणेश आरतीचा भक्तिमय सोहळा महापौर समीर राजूरकर, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्यासह भाजपचे नगरसेवक व नगरसेविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री गणरायाची आरती करून दर्शन घेतले.



माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महापौर समीर राजूरकर, नगरसेवक महेश माळवदकर, जालिंदर शेंडगे, अशोक दामले, विजयसिंह झाला, नितीन खरात, सुनील जगताप, पदमसिंग राजपूत, रामेश्वर भादवे, हर्षवर्धन कराड तसेच नगरसेविका कमल रामचंद्र नरोटे, अनिता किशोर मानकापे, कीर्ती शिंदे, सविता कुलकर्णी, अर्चना निळकंठ, शोभा बुरांडे, संगीता सांगळे, छाया खाजेकर, शिल्पाराणी वाडकर व अमृता पालोदकर यांनी आरतीमध्ये सहभाग घेतला. महापौर, नगरसेवक व उपस्थित मान्यवरांमध्ये छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध विकासकामे, नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच मूलभूत सुविधांबाबत चर्चा झाली.

# जाधववाडीत मध्यरात्री कोयत्यांचा धुमाकूळ! तिघांवर जीवघेणा हल्ला

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर

सणासुदीच्या काळात शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जाधववाडीतील सिद्धेश्वर कॉलनी परिसरात सोमवारी रात्री क्षुल्लक कारणावरून सशस्त्र टोळक्याने धुमाकूळ घातल्याची घटना घडली. हातात कोयते घेऊन आलेल्या टोळक्याने तरुणांवर हल्ला केल्याने तिघे जण जखमी झाले. हल्ल्यानंतर संतप्त आरोपींनी परिसरातील दुचाकींची तोडफोड करीत घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकारामुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

सोमवारी (२१ सप्टेंबर) रात्री साडेअकराच्या सुमारास दिनेश रमेश पाटील (३०, रा. सिद्धेश्वर कॉलनी, जाधववाडी) हे देवेश बोडखे, समर्थ बोडखे, यशकुमार बोडखे आणि गौरव फुके यांच्यासोबत घरासमोरील ओट्यावर बसले होते. याचवेळी प्रवीण थोरात, पवन तवार, दिनेश पवार, दीपक मालोदे, किरण थोरात आणि अमोल पवार हे कथितरीत्या हातात शस्त्रे घेऊन तेथे आले.

‘तो मुलगा कुठे आहे? त्याला बाहेर काढा,’ असे म्हणत संबंधितांनी शिवीगाळ आणि आरडाओरड सुरू केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर वाद अधिक चिघळल्याचा आरोप आहे.

तक्रारीनुसार, प्रवीण थोरात याने कोयत्याने दिनेश पाटील यांच्या डोक्यावर तसेच हाताच्या बोटांवर वार केले. त्यानंतर समर्थ राम बोडखे याच्यावरही कोयत्याने हल्ला करण्यात आला. दरम्यान, दिनेश पवार याने यशकुमार सुनील बोडखे याच्या डोक्यावर कोयत्याने वार केल्याचा आरोप आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला.

हल्ल्यात जखमी झालेले तिघेही रक्तबंबाळ अवस्थेत पडल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर हल्लेखोरांनी परिसरात उभ्या असलेल्या मोटारसायकली खाली पाडून त्यांची तोडफोड केली आणि तेथून पळ काढल्याचे तक्रारीत नमूद आहे.

घटनेनंतर जखमींनी हर्सूल पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना तातडीने घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. वैद्यकीय उपचारादरम्यान दिनेश पाटील यांच्या डाव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली, तर समर्थ बोडखे यांच्या डोक्यावर दोन आणि यशकुमार बोडखे यांच्या डोक्यावर तीन टाके पडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी दिनेश पाटील यांच्या तक्रारीवरून हर्सूल पोलीस ठाण्यात प्रवीण थोरात, पवन तवार, दिनेश पवार, दीपक मालोदे, किरण थोरात आणि अमोल पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अर्जुन दांडेगावकर करीत आहेत.

दरम्यान, सणासुदीच्या काळात मध्यरात्री वस्तीत शस्त्रांचा वापर करून झालेल्या या कथित हल्ल्यामुळे जाधववाडीतील सिद्धेश्वर कॉलनी परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गणेश विसर्जनाची जय्यत तयारी; आयुक्तांकडून विसर्जनस्थळांची पाहणी, मूर्तीदानाचे नागरिकांना आवाहन

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिकेच्या आगामी गणेशोत्सव आणि गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा प्रशासक अमोल येडगे यांनी आज शहरातील विविध विसर्जन विहिरी व कृत्रिम तलावांची प्रत्यक्ष पाहणी करत तयारीचा आढावा घेतला. नागरिकांची सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक विसर्जन व्यवस्थेला प्राधान्य देत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या आहेत. पाहणी दौऱ्यादरम्यान नागरिकांना जवळचे मूर्तीदान संकलन केंद्र किंवा विसर्जन स्थळ सहज उपलब्ध व्हावे, यासाठी विशेष क्यूआर कोड तयार करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर नागरिकांना सर्व विसर्जनस्थळांची माहिती एका क्लिकवर मिळण्यास मदत होईल. महानगरपालिकेच्या वतीने शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी एकूण ४७ ठिकाणी मूर्तीदान संकलन केंद्रे उभारण्यात येत आहेत. नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या गणेशमूर्ती या संकलन केंद्रांवरच जमा कराव्यात, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले आहे. संकलन केंद्रांवर प्राप्त झालेल्या गणेशमूर्तींचे विधिवत पूजन करून औपचारिक विसर्जन करण्यात येईल आणि त्यानंतर या मूर्ती मूर्तिकारांकडे सुपूर्द केल्या जातील.



विसर्जनस्थळी येणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन पुरेशी प्रकाश व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आयुक्तांनी आजच्या पाहणी दौऱ्यात जिल्हा परिषद मैदान येथील विसर्जन विहीर, संभाजी पेठ, एन-१२ येथील विसर्जन विहीर, राजीव गांधी स्टेडियम येथील कृत्रिम तलाव, शिवाजीनगर येथील विसर्जन विहीर तसेच देवळाई तलाव या विविध विसर्जनस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील नियोजनाचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यादरम्यान अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी यांच्यासह संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सेझच्या जमिनी शेतकऱ्यांनाच परत मिळणार : हेमंत म्हात्रे

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**



**उरण /रायगड :** महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) संपादित करण्यात आलेल्या, मात्र निर्धारित कालावधीत वापरात न आणलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचा दावा सेझग्रस्त शेतकरी संघटना उरण, पेण व पनवेलचे अध्यक्ष हेमंत म्हात्रे यांनी केला आहे. या जमिनी सरकारजमा न होता नियमानुसार संबंधित शेतकऱ्यांनाच परत मिळतील, असे त्यांनी सांगितले.

म्हात्रे यांनी सांगितले की, मागील सहा वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरू आहे. कुळकायदा कलम ६३ (१अ) अन्वये मे. महामुंबई एस.ई.झेड. लि.साठी संपादित करण्यात आलेल्या जमिनी कंपनीने १५ वर्षांच्या कालावधीत वापरल्या नसल्याने सुमारे १२०० शेतकऱ्यांनी ॲड. दत्तात्रेय नवाळे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे जमिनी परत मिळण्यासाठी चौकशी अर्ज दाखल केले आहेत. या प्रकरणाची अंतिम सुनावणी पूर्ण झाली असून निकालाची प्रतीक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पेण तालुक्याचे आमदार रवी पाटील यांनी सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महसूल मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात दोन बैठका आयोजित केल्या होत्या. या बैठकीत १५ वर्षे जमीन वापरात न आणल्याच्या प्रकरणांमध्ये नियमानुसार जमिनी परत देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे म्हात्रे यांनी सांगितले. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी २९ जुलै २०२६ रोजी महसूल व वन विभागाला पाठविलेल्या अहवालात, संपादित जमिनींच्या बदल्यात पुनर्वसनाचे लाभ शेतकऱ्यांना देण्यात आले नसल्याने संबंधित जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केल्याचा दावा करण्यात आला आहे. उरण, पेण व पनवेल तालुक्यातील सेझसाठी संपादित झालेल्या जमिनींबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शेतकऱ्यांच्या भूमिकेला बळ देणारा असल्याचे सेझग्रस्त शेतकरी संघटनेचे कायदेविषयक सल्लागार ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी सांगितले. दरम्यान, या प्रश्नावर संघटनेने दीर्घकाळ पाठपुरावा केल्यानंतर आता काही राजकीय मंडळी श्रेय घेण्यासाठी बैठका व मोर्चे काढत असल्याचा आरोप हेमंत म्हात्रे यांनी केला. “सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना नियमानुसार परत मिळाव्यात, हीच आमची प्रमुख मागणी आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.

# जिंतूर येथे साईनाथ महाराज वसमतकर यांच्या हस्ते रुग्णांना मोफत डबे वाटप व स्वच्छता अभियान

## राष्ट्रसंत सद्गुरु साईनाथ महाराज वसमतकर यांचे प्रतिपादन; ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना डबे वाटप, महापुरुषांच्या पुतळा परिसरात स्वच्छता मोहीम

**जिंतूर :** दि २२ "कलियुगात मानवी जन्माचे सार्थक करायचे असेल, तर केवळ स्वतःचा विचार न करता स्वच्छता, वृक्ष लागवड, अन्नदान आणि ज्ञानदान या चतुःसूत्रीचा अवलंब केला पाहिजे. या सत्कार्यातूनच समाजाची खऱ्या अर्थाने उभारणी होते," असे रोखठोक प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे ब्रँड ॲम्बेसिडर, स्वच्छतादूत तथा आयटीआयचे प्रमुख मार्गदर्शक (महाराष्ट्र शासन) प.पू. राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांनी येथे केले.

जिंतूर येथील ग्रामीण रुग्णालयात मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता रुग्णांना मोफत डबे वाटपाचा स्तुत्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

**महापुरुषांच्या पुतळा परिसराची स्वच्छता**

कार्यक्रमापूर्वी साईनाथ महाराज यांनी आपल्या दत्तभक्तांसह स्वतः हातात झाडू घेऊन वसंतराव नाईक पुतळा, अण्णाभाऊ साठे पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर स्वच्छ केला. या सर्व महापुरुषांना अभिवादन करून स्वच्छता अभियान राबवण्यात आले.



**रुग्णांना मोफत डब्यांचे वाटप**

जिंतूर ग्रामीण रुग्णालयातील गरजू रुग्णांना मान्यवरांच्या हस्ते मोफत अन्नधान्य व जेवणाचे डबे वाटप करण्यात आले. या वेळी साईनाथ महाराजांनी उपस्थितांना विविध उदाहरणे देऊन स्वच्छता, वृक्ष लागवड, अन्नदान आणि ज्ञानदानाचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले.

**आयटीआय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**



जिंतूर-औंढा रस्तनावरील पुंगळा एम.आय.डी.सी. परिसरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (ITI) विद्यार्थ्यांना साईनाथ महाराजांच्या हस्ते मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच समाजभान जपावे, असा संदेश त्यांनी या वेळी दिला.

या कार्यक्रमास जिंतूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय मस्के, युवा नेते बाळासाहेब देशमुख, माजी नगरसेवक गणेश कुरे, अशासकीय सदस्य जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद परभणी ज्येष्ठ पत्रकार मंचक देशमुख, व्हॉईस ऑफ मिडिया तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, उपअध्यक्ष संदीप माहूरकर, भागवत चव्हाण, शेख रहीम यांच्यासह बहुसंख्य नागरिक व भाविक उपस्थित होते.

**स्वच्छता, अन्नदानातून समाजसेवेचा संदेश**

राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांच्या हस्ते मंगळवारी जिंतूर येथे स्वच्छता अभियान व रुग्णांना मोफत डबे वाटप उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण रुग्णालयातील गरजू रुग्णांना अन्नदान करण्यात आले, तर महापुरुषांच्या पुतळा परिसरासह नगर परिषद परिसराची स्वच्छता करण्यात आली. यावेळी साईनाथ महाराज यांनी स्वच्छता, वृक्षलागवड, अन्नदान व ज्ञानदान या चार सूत्रांतून समाजसेवेचा संदेश दिला. स्वच्छ भारत, निरोगी भारत ही संकल्पना जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने न.प. अधिकारी उमेश ढाकणे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो भेट देण्यात आला. कार्यक्रमास डॉ. संजय मस्के, बाळासाहेब देशमुख, गणेश कुरे, मंचक देशमुख, सचिन रायपत्रीवार, भागवत चव्हाण आदी उपस्थित होते.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▮ संपादक : रोहित विकास पाटील ▮ email : hinduprakashvarta@gmail.com ▮ epaper.hinduprakashwarta.com ▮ PRGI No.: MHMAR/25/A2358 ▮ संपर्क क्र. : 7261999911